# अभिरुची

**मराठी मंडळ सॅक्रामेंटोचे त्रैमासिक मुखपत्र.**

- प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक मंडळ सहमत असतेच असे नाही.
- लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलांचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक मंडळाकडे राहतील.

## २०१६ अंक #१

## या अंकात


- संपादकीय प्रस्तावना — अजित नातू
- अध्यक्षीय — विक्रम बोबडे
- २०१६ मंडळ कार्यकारिणी सभासद ओळख — कार्यकारिणी
- Journey within Heart and Realizing True Self — निखिल चांदेकर
- २०१६ मंडळ कार्यक्रम कॅलेंडर — कार्यकारिणी
- जगन्मित्र - पद्माकर शेंडे — कुमार कुलकर्णी
- “गुरु” अर्थात - पद्माकर शेंडे — सुधीर कर्णिक
- नटसम्राट - सिनेमा समीक्षण — श्री. अरविंद साने
- कविता - Obsolete Thee Loyalty — अजित नातू
- मंडळाची मराठी शाळा - दुसरे वार्षिक संमेलन — पल्लवी सावंत अमिता खरे
- स्वतःची चित्रकला - मोर — अमेय धुमाळ
- नेहेमीची सदरे -जम्मत, माहित आहे का
- पाककृती - ब्रेडची भजी
- शब्दकोडे

# संपादकीय प्रस्तावना - या अंकाची ओळख



## संपादक - अजित नातू

नमस्कार मंडळी

**मंडळाच्या मासिकाचा २०१६चा हा पहिला अंक तुमच्या हाती देताना खूप आनंद होत आहे.** मागील वर्षीप्रमाणे यंदाही त्याच किंवा जास्त जोमाने प्रतिसाद मिळेल हि इच्छा करतो. २०१६च्या नवीन कार्यकारिणीचे हार्दिक स्वागत करतो. यंदाही नेहेमीप्रमाणे मिळूनमिसळून जोमदार व छानदार कार्यक्रम होतील ह्याची खात्रीच आहे. विक्रम बोबडे यावर्षीचे अध्यक्ष आहेत, त्यांच्याकडे मंडळाचे सेक्रेटरी पद काही वर्षापूर्वी होते अन ते विक्रमने प्रचंड उत्साह, नवीन कल्पना सामोऱ्या आणून समर्थप्रणे पेलले होते. त्याच्याकडे संयोजन कौशल्य आहे, मंडळाबद्दल आपलेपणा आहे. त्यांने साथीला नवीन तरुण सभासदांना कार्यकारिणीमध्ये सामावून घेतले आहे त्यामुळे नवीन उत्साह, नवीन विचार घेऊन यंदाची कार्यकारिणी वेगवेगळे कार्यक्रम आपल्या सर्वांसमोर आणेल ह्याची खात्री आहे. त्या सर्वांना माझ्यातर्फे अनेक शुभेच्छा. विक्रम व कार्यकारिणीने स्वतःची ओळख (फोटोसकट) करून दिली आहे ती ओळख नक्की वाचा.

निखिल चान्देकरने ह्यावेळी अतिशय उत्तम व सर्वांना मदत होईल असा माहितीपर लेख लिहिला आहे. जरूर वाचा हा लेख व त्यातून तुम्हाला नक्की मदत होईल याची खात्री वाटते. हि अतिशय मदत करणारी आवश्यक माहिती पुरवल्याबद्दल निखिलचे आभार. मी व निखिल वेळोवेळी वेगवेगळ्या विषयांवर गप्पा करून, विषयविस्तार करून व त्यानंतर लोकांना उपयोगी काय याचा विचार करून एकएक विषय निवडतो. त्यातून मग असे लेख ह्या मासिकात दर अंकात द्यायचा आमचा मानस आहे. माहितीपूर्ण व समाजोपयोगी लेखनाबद्दल निखिलचे पुन्हा ह्याही महिन्यात धन्यवाद.

एक दुर्दैवी घटना घडली ती म्हणजे आपले एक सभासद श्री. पद्माकर शेंडे यांचे निधन. सगळ्या मंडळाला हळहळ वाटली. अर्थात पद्माकर माणूसच मस्त होता ज्यांचे मोकळे हास्य आणि मन माझ्या कायम लक्षात राहील. आता ते आपल्याला समारंभात दिसणार नाहीत हे कसेसे होते. ते व त्यांची पत्नी कैलासवासी अनिताताई हे खरे साथीदार व आता दोघे पुन्हा पलीकडे ‘त्या’ जगात भेटणार हा

विचार मनी आला. त्यांच्याशी माझे संबंध अगदी जिव्हाळ्याचे होते. बागकामाची आवड व backyard कसे फुलावायचे हे त्यांनाच ठाऊक. त्याबद्दल खालील विचार येऊन गेले:

जायच्या वेळा माहित नाहीत
आपण मागे, त्याना जावे लागले

खूप किती ठसा उमटविला
जेव्हढी माणसे हृदयी भरली

जेव्हढी मने आपुली केली
तेव्हढे जग त्यांचे झाले

गोरा रंग, मोकळे हास्य, निर्मल मन
पलीकडे गेले, कदा देवासी आपुले करण्यासी

पद्माकर शेंडे याबद्दल त्यांच्या दोन जिव्हाळ्याच्या मित्रांनी म्हणजे कुमार कुलकर्णी व सुधीर कर्णिक यांनी आपले मनोगत लेखाद्वारे व्यक्त केले ते तुंम्ही नक्की वाचा. त्यावरून कळेल कि पद्माकर किती हवाहवासा वाटणारा माणूस होता व कुमार आणि सुधीर किती त्यांच्या जवळचे मित्र, जणू कुटुंबियच होते ते कळून येईल. कै. पद्माकर शेंडे यांच्या आत्म्याला शांती मिळो हि मंडळातर्फे प्रार्थना.

श्री. अरविंद साने यांनी (मोनिका सानेचे सासरे) यावेळी आपल्या येथे दाखविलेल्या 'नटसम्राट' मराठी चित्रपटाबद्दल एक सविस्तर समीक्षण लिहिले आहे ते सुंदर झाले तर आहेच पण त्यातून हे शिवधनुष्य पेलायला चित्रपटाच्या मंडळीना किती कठीण होते व ते त्यांनी कसे समर्थपणे पेलले हे समजून येते. ह्या अरविंद साने यांचे खूप आभार. ते नियमित लिहितात व पुढेपण असेच लेख मिळावेत हि विनंती.

अजित नातू यांनी 'Loyalty याविषयावर एक मनोगत कवितेतून व्यक्त केले आहे. आज loyaltyकशी नष्ट झालेली आहे हे त्या कवितेतून सांगितले आहे. ती कविता तुंम्ही वाचा व अभिप्राय कळवा.

अमेय धुमाळने काढलेले चित्र खूप सुंदर आहे. शाबास अमेय, त्याला भेटून कौतुकाची थाप पाठीवर द्य्याला विसरू नका. काही दिवसापूर्वी मंडळाच्या मराठी शाळेचा वार्षिक समारंभ साजरा झाला. त्याचा वृतांत व फोटो या अंकात आपल्याला बघायला मिळतील.

बाकी इतर नेहेमीची सदरे, जसे पाककृती, शब्दकोडे, 'माहिती आहे का' वगैरे याही अंकात आहेत ती तुम्ही नक्की वाचा.

मंडळाचे वार्षिक कार्यक्रम व तारखा यांचा तक्ता कार्यकारिणीतर्फे सादर केला आहे. तो नक्की वाचा व नोंद घ्या. सर्व कार्यक्रमाना आपण प्रत्यक्ष भेटू या (म्हणजे, अहो, भेटायचे झाले तर कार्यक्रमाना भरपूर संख्येने हजर रहायलाच हवे, नाही का!). तशी मनापासून विनंती.

जाहिरातदार तर किती महत्वाचे हे आपल्याला माहितीच आहे. अभिमानाची गोष्ट अशी कि त्यातील काही आपल्या मंडळाचे सभासदही आहेत. त्या सर्व जाहिराती वाचा, त्यातील लिंकवर जाऊन माहिती घ्या आणि ह्या जाहिरातदारांशी संपर्क साधा.

पुन्हा एकदा सर्व लेखकांचे मनापासून आभार. वाचकांना यावरून स्वतः लेख, कविता किंवा संबंधित विषयांवर लिखाणाची स्फूर्ती मिळेल अशी आशा करतो. मंडळातील सर्व लोकांना असे काही लेख, कविता, पाककृती, फोटो, इतर काहीही तुमचे स्वतःचे किंवा तुमच्या जवळच्या नातेवाईकांचे लिखाण ह्या मासिकासाठी पाठवा अशी विनंती आवर्जून करतो. मराठी लिहिण्याचा सराव आपण सर्वच मायदेशी ठेऊन आलो आहोत, त्यामुळे ह्या अंकात काही चुका झाल्या असतील, व्याकरण चुकले असेल, इंग्रजी शब्द आले असतील किंवा तपशील चुकला असेल तर खरच मनापासून क्षमस्व. मराठी जागे ठेवायचा हा एक प्रयत्न ह्याच फक्त दृष्टीने पहा व वाचा.

**ह्या आवृतीबद्दल अभिप्राय आवर्जून मला व कार्यकारिणीला कळवा. कारण त्यातून सुधारणा व्हायला मदत तर होतेच शिवाय असे मराठी मासिक चालू ठेवायला उत्साहपण येतो.**

**धन्यवाद!**

**अजित नातू**

**(संपादक, अभिरुची, mmsac)**

ajit_natu@hotmail.com

# अध्यक्षीय (२०१६ मंडळ अध्यक्ष: विक्रम बोबडे)



नमस्कार मंडळी,

सर्वप्रथम २०१६-१७ च्या नवीन कार्यकारिणी कडून अध्यक्ष ह्या नात्याने मी सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा देतो. हे वर्ष तुम्हासर्वांना सुख-समृद्धीचे आणि भरभराटीचे जावो ! मंडळी, जानेवारी महिन्यात झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत, १ फेब्रुवारी २०१६ ते ३१ जानेवारी २०१७ ह्या एक वर्ष्याच्या कालावधीसाठी नवीन कार्यकारिणी निवडण्यात आली. त्यानुसार मी विक्रम बोबडे (अध्यक्ष), पूनम जाधव (कोषाध्यक्ष), प्रिया जोशी (सचिव), श्रीकांत जोशी (सह-कोषाध्यक्ष) आणि कौस्तुभ उपाध्ये (सह-सचिव) ह्यांनी मुख्य-कार्यकारिणीचा पदभार स्वीकारला. आमच्याबद्दल थोडक्यात माहिती ह्या अंकात समाविष्ट केलेली आहे त्या द्वारे आमची तुम्हसर्वांना ओळख व्हावी हा प्रयत्न. आम्हांसर्वांना साथ द्यायला विक्रांत सावंत (webmaster & BMM representative), अजित नातू (अभिरुची-संपादक), मंदार निमकर (sponsorship management), आयुषी अडेत्तीवार (youth representative), विनायक पाटील, डॉ. अमर पवार (IAS representatives) आणि जान्हवी कुलकर्णी (auditor) हि मंडळी सुद्धा आहेत. त्याचप्रमाणे प्रत्येक कार्यक्रमासाठी झटणारे स्वयंसेवक, मंडळाला आर्थिक मदत करणारी मंडळी, सांस्कृतिक कार्यक्रमात हिरहिरीने भाग घेणारे स्थानिक कलाकार, आपले प्रायोजक आणि आपणसर्व सुद्धा आमच्या बरोबर आहातच. मराठी मंडळाचा कुठलाही कार्यक्रम ह्या सर्व लोकांशिवाय यशस्वी होवूच शकत नाही. मंडळी, ह्या अंकात आम्ही २०१६-१७ च्या कार्यक्रमाचे कॅलेंडर समाविष्ट केलेले आहे. माझी आपणा सर्वांना विनंती आहे कि तुम्ही त्याची नोंद घ्यावी. शक्यतोवर ह्या तारखांमध्ये बदल होणार नाही ह्याचा आम्ही प्रयत्न करू पण कधी-कधी नाईलाजाने थोडाफार बदल होऊ शकतो; त्या बद्दल मी आधीच आपली क्षमा मागतो.

मंडळी, मला तुम्हांसर्वांना काही सूचना करायच्या आहेत. वरकरणी जरी ह्या फार छोट्या-छोट्या गोष्टी असल्या तरी त्या आपण जर का अमंलात आणल्या तर त्या मुळे आम्हां कार्यकर्त्यांना बरीच मोठी मदत होऊ शकते. तरी आपण सर्वांनी खालील सूचनांचा गांभीर्याने विचार करावा. जी मंडळी ह्या सूचना आधीपासूनच अमलांत आणत आहेत त्यांना धन्यवाद.

१ प्रत्येक कार्यक्रमासाठी कृपया वेळेत RSVP करावी. बरीच मंडळी evite/facebook event ला शेवटपर्यंत उत्तरच देत नाहीत. आपण जर का आपलं उत्तर (हो/नाही) जे काही असेल ते जर वेळेत दिलत तर त्यामुळे आम्हाला कार्यक्रमाच्या नियोजनात बरीच मदत होईल.

२ तसंच, जर आपण वेळेत पैसे (मेंबरशिप फी आणि कार्यक्रमाची फी)  भरलेत तर त्यामुळे सुद्धा बरीच मदत होऊ शकते.

३ आपण जर का सोशल मिडिया चा वापर करत असाल तर कृपया MMSAC च्या फेसबुक पेज ला लाईक करा आणि त्या वरच्या पोस्टसना शेअर/लाईक करा. त्यामुळे आपल्या मंडळाच्या कार्यक्रमांची माहिती जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहचू शकते.

४ आपले जे प्रायोजक आहेत त्यांच्या प्रोडक्ट्स किंवा सर्विसेस बद्दल माहिती जाणून घ्या आणि शक्य असेल तेंव्हा त्यांचे ग्राहक बना. हि मंडळी आपल्या मंडळाला आर्थिक पाठींबा देत आहेत त्यामुळे आपण सुद्धा त्यांचा विचार करावा, अर्थात त्यांचे प्रोडक्ट्स किंवा सर्विसेस तुमच्या कसोटीला खरे उतरले तरच !

५ आपण जर साक्रामेंटो भागातील एखाद्या नवीन मराठी कुटुंबाला भेटलात तर त्यांना आपल्या मराठी मंडळाबद्दल जरूर माहिती द्या आणि सभासद होण्यासाठी विनंती करा. तसेच त्यांना आपण चालवत असलेल्या मराठी शाळेबद्दलहि माहिती द्या.

६ जर का आपण amazon.com वरून खरेदी करत असाल तर त्या ऐवजी smile.amazon.com हि वेबसाईट वापरा. त्यावर तुम्ही Marathi Mandal Sacramento ह्या आपल्या मंडळाला आपली चैरिटी संस्था म्हणून निवडू शकता. अमेझॉन हि कंपनी आपल्या मंडळाला आपण केलेल्या खरेदी बद्दल काही रक्कम दान म्हणून देईल. ह्या गोष्टीचा आपण घेत असलेल्या वस्तूच्या रकमेवर कुठलाही परिणाम होणार नाही.

मंडळी, आपल्या मंडळातील बहुतेकांना परिचित असेलेले श्री. पद्माकर शेंडे ह्यांचे दि. ६ फेब्रुवारी रोजी दुखःद निधन झाले. पद्माकर काका हे आपल्या मंडळाचे नुसते हितचिंतकच नव्हते तर ते आपल्या मंडळाच्या कार्यक्रमाना आवर्जून उपस्थीत असायचे, शक्य असेल तेव्हढी मदत करायचे आणि कार्यकर्त्यांचे मनोधैर्य वाढवायचे. त्यांनी अभिरुची मध्ये लेखनही केले होते. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो. मराठी मंडळ त्यांच्या कुटुंबाच्या दुखा:त सामील आहे.

ह्या नवीन वर्ष्याच्या सुरवातीचा हा अभिरुचीचा अंक आपल्या पुढे ठेवतांना मला खूप आनंद होत आहे. कृपया आपण तो संपूर्ण वाचावा हि अपेक्षा. आपल्या काही सूचना असतील तर त्या नक्कीच आमच्यापर्यंत पोहोचवा. अभिरुचीच्या माध्यमातून तुमची मराठी लिहिण्याची (किंवा टाइप करण्याची) आणि वाचण्याची

सवय खंडित होऊ नये तसेच आपल्या मंडळातील इतर घडामोडींची माहिती मिळावी हाच उद्देश. ह्या अंकासाठी अजित नातूने भरपूर मेहेनत घेतली आहे. त्याला आणि ज्यांनी ह्या अंकासाठी साहित्य पाठवलं आहे त्यांना मी खूप-खूप धन्यवाद देतो. माधुरी नातू यांनी मासिकाच्या आवृतीचे परीक्षण करून लिखाणातील त्रुटी भरून काढायला मदत केली त्याबद्दल माधुरीलासुद्धा धन्यवाद देतो.

आपला नम्र

विक्रम बोबडे

अध्यक्ष मराठी मंडळ साक्रामेंटो २०१६-१७

# KIFS Kotwal Insurance & Financial Services

***People don't plan to fail, They just fail to plan***

When it comes to happy retirement, key is to plan well.

**Dear Friend,**

**Just Half an Hour with Me Can HELP you:**

- Plan for your children's college education
- Generate a **tax free** income from retirement till age 100
- Roll over your orphan IRAs and 401 Ks into meaningful, secure investment for guaranteed retirement income.
- Select a right insurance policy to cover your **mortgage** fully in case of death
- Reevaluate your existing insurance policy free of cost and if necessary suggest a better policy that will give you life coverage and completely tax free retirement income

In short, help you with planning all aspects of your financial life. Please call

**Ray Kotwal, MBA Finance**

**Life Insurance and Planning Specialist**

**Insurance License No. OH12645**

Remember KIFS for all your financial needs

Kotwal Insurance & Financial Solutions

www.raykotwal.biz raykotwal@hotmail.com

# २०१६ मंडळ कार्यकारिणी सभासदांची ओळख

## Vikram Bobade – President



Vikram hails from Nagpur, Maharashtra and currently lives in Folsom. He works for HP Networking in Roseville. He volunteered for Secretary position in MMSAC 2014-15 committee and worked hard along with other members of the committee to deliver a successful year for MMSAC. In the past, he was also part of Austin Marathi Mandal committee. During college days, he was in the organizing committee of "Aarohi", one of the largest intercollegiate cultural festivals of central India organized by VNIT Nagpur. His interests are listening to music, traveling, reading and watching documentaries. In the past he has acted in various Marathi plays. He has also participated in a skit for Nagpur Akashwani. He looks forward for another successful year in MMSAC's history and seeks cooperation from all the Marathi speaking families in Sacramento area.

## Poonam Jadhav – Treasurer



Poonam is living in Roseville since 2011 with husband Umesh and two kids – Abhishek, who is a freshman in undergrad and Pooja, who is a freshman in high school. She is an Ayurvedic Doctor by education and currently working for Optum 360. Sacramento is a home away from home for her as this is the city where she started her journey in US in 1995. She has been actively taking part in cultural activities from her school days and has had the opportunity to continue that hobby in two of her other homes in US – Los Angeles and Michigan. She has previously enjoyed

the opportunity to serve us as a treasurer for MMSAC in 2012-13. She enjoys being part of a community that supports forums such as MMSAC which provides a platform for all generations to come together and preserve/demonstrate/cultivate our culture and build long term friendships that create a sense of belonging.

## Priya Joshi – Secretary



Moving from the East Coast, Priya has now been in California since 2008. Though exposed to the professional world back in India, following her post- graduation in Management, now enjoys “bliss” of “raising family”. Mother of two gorgeous girls considers herself lucky to be able to be a “stay-at-home mom” cherishing every minute of their blossoming years.

Now, with the kids being away at school, allows her to spare time for some volunteering activities, one of which is to serve our own community, MMSAC. Being a Teacher at Marathi Shala is another endeavor with the same objective.

Her motto about MMSAC is that it is “Mazha Mandal, Tumcha Mandal, Aapla Mandal”. With this thought, she is ready to put in her 100% to bring in Quality, Multi- genre programs, encourage local talent, promote “a culture of openness” in the Mandal operations and contribute to an ever-increasing forum to gather Marathi people to experience the “Home away from Home” feeling.

She sees herself as a person with a Holistic approach to life , earnest believer in Spirituality, finds solace in Yoga and Meditation, love for Hindustani Classical Music, affinity for movies and drama , adores nature and nurtures a passion for cooking.

## Shrikant Joshi – Jt. Treasurer



Originally a Dombivalikar, then a Punekar and now a Folsomwasi (since 2008), Shrikant has stayed close to his roots, yet has embraced each new experience as an expansion of his Maharashtrian ethos. It is this core ethos that over the years has made him an active co-treasurer and participant in programs celebrating Maharashtrian culture. The Marathi Mandal of Sacramento (MMSAC) has provided him a continuing context for him and his family's cultural interests. He has participated in multiple and diverse cultural events. His organizational and cultural skills were formally recognized by the MMSAC. In his college days, he was invited to serve an annual term as the President of the INSYNCH a reputed intercollegiate cultural competition extravaganza. He has embraced this role with the same level of skill, professionalism and organization that have served him in his 15 years of experience and that have led him to his current position as joint treasurer MMSAC. Principally Shrikant and his committee have established three fundamental goals for expanding the success of the Mandal over the coming year. These are to (a) expand publicity for the Mandal beyond Sacramento area, (b) enhance propagation of and access to Mandal events, and (c) increase member enrollment in the MMSAC and participation in regular Mandal events. It is the combination of professional zeal and personal passion that will allow Shrikant to contribute to the success of the MMSAC.

## Kaustubh Upadhye – Jt. Secretary



Kaustubh is MS in computer engineering from Sacramento state. Currently working with Intel corporation Folsom. He is from Nigdi Pradhikaran, Pune. Studied in Dnyanprabodhini School and did his bachelor's in electronics from university of Pune. He worked in Mahindra and

Mahindra Chakan for 2 years before coming to USA in fall 2013. Playing Volleyball, Travelling and Cooking are his hobbies. He has great interest in Meditation, Yoga as well. He and his friends started Sac State Ganesh festival in year 2013 and they all have been enjoying the celebrations every year since then. He is looking forward to contribute his young spirit in MMSAC Committee 2016-17. He is looking forward for everyone's presence at MMSAC events 2016-17.

---

**MMSAC committee would like to thank you for your generous donation for 2016-17.**

- Mukund & Asha Gangal.
- Prithviraj & Manisha Hotpeti.
- Mahesh & Amita Natu.
- Trinetra Indian Store.


California IVF Fertility Center
In Collaboration with UC Davis Health System
Offices in Sacramento and Davis
Fertility Testing and Treatment
IVF, ICSI, and Inseminations
Tubal Reversal Surgery
Vasectomy Reversal
Genetic Testing of Embryos
PGD/PGS
Family Balancing (Boy or Girl)
Egg Donation Program
Donated Embryos
(530) 771-0177
www.CaliforniaIVF.com

## लेख: Embarking on the Journey within Heart and Realizing True Self



लेखक: निखिल चांदेकर

The most basic questions asked by people are:

1. What is the need of realization
2. How do I get started

Realization is an experience which indicates an evolutionary process. It is like moving from elementary to middle school and then to high school. It is not to get or acquire any tangible material goods but to experience higher realm of existence. Most of the people believe that human existence is the only existence and we are here to achieve only material and physical pleasures and satisfaction. The reason most of the people do not get inclined towards higher existence because the mind is addictively and heavily occupied with thoughts. The journey starts when the mind comes to stand still and chirping of the mind settles down.

Meditation is the surest ways to transcend the noisy mind. Alternatively, it is recommended that people read following book, "Untethered Soul" written by Michael A Singer. Here is the summary of the book which can help you with your journey to transcend the noisy mind and discover the pearls within your heart.

### Steps to Realization

1. **Realize that you are in there.** You must first come to realize that you are in there. From deep inside, you are experiencing this world. You are experiencing your physical body, your thoughts and your emotions. You are conscious and you are experiencing what it is like to be human.

**2. Realize that you are not okay in there.** Look to see what's going on inside. If you want to understand why you've done everything you have ever done, if you want to see what's really going on, just observe your mind and emotions—just experience your inner state. If you objectively look, you will see that you are never completely at peace. You will see that you are not okay in there.

**3. Realize that you're always trying to be okay.** At any point when you look at the state of your inner being, you will see that something is bothering you. You will then notice that this causes urges, drives and impulses to do something about it. You will find yourself constantly trying to either get something or avoid something. All of this is done in an attempt to be okay.

**4. Realize that your mind has taken on the job of figuring out how everything needs to be for you to be okay.** If you watch, you will see that your mind is always telling you what you should and should not do, what others should and should not do, and how things should and should not be. All of this is the mind's attempt to first create a conceptual model of what would make you okay, and then try to get the outside world to match it.

**5. Realize that the process of defining how the outside needs to be is not going to make you okay.** You must seriously look at this process of trying to be okay. You've been at it your entire life—you've just tried different things at different times. While it's true that sometimes you manage to make it better for short periods of time, you know that you've never even come close to reaching a state of permanent peace. Watch very closely how you react to the things your mind has preferences about. You will see that if your mind gets what it wants, you feel joy; if it doesn't get what it wants, you feel disturbance. Likewise, when your mind experiences what it doesn't want, you feel disturbance, and when it avoids what it doesn't want, you feel relief. You will never be okay playing this game because the world will never match the conceptual model your mind has made up. Eventually, you will come to see that struggling to be okay does not work. At some point, you will try to find a different way to be okay in there.

**6. Learn to not participate in the mind's struggle to be okay.** This step is about learning to sit in the witness, the part of you that notices the inner urges to be okay. You must become comfortable with sitting in there and not participating in the inner energies. You learn to relax in the midst of them. You come to see that there is a habitual process in which the moment you feel inner disturbance, you are drawn into doing something about it. You must learn to sit inside and not participate in this process. If you truly understand that going outside to try to be okay inside doesn't work, then you'll be willing to sit inside and simply allow the disturbance to pass through. It is not difficult. If you can do this, all disturbance will cease by itself.

**7. Learn to go about your life just like everyone else, except that nothing you do is for the purpose of trying to be okay.** If you aren't so preoccupied with trying to be okay, you will be free to sit inside and quietly love, serve and honor whatever naturally unfolds in front of you. When you reach this point, you are no longer living for yourself. You are interacting with life, but not for the purpose of being okay.

**8. As you sincerely let go of the inner energies you are watching, you begin to feel a deeper energy come in from behind.** Up to this point, everything you were watching inside was in front of you. But now that you are no longer being drawn into those personal energies, you'll realize that your inner universe is actually very expansive. You will begin to feel Spirit flow in from behind. It lifts you and brings you great love and joy.

**9. Your inner experience becomes so beautiful that you fall in love with the energy itself, and you develop a very deep and personal relationship with it.** It will become completely clear to you that there is an absolute trade-off between your personal energies and the amount of Spirit that you feel. The more you get drawn into your personal energies, the less Spirit you feel. The more you don't participate in your personal energies, the more Spirit you feel. You now have a direct relationship with the spiritual energy, and you will find yourself constantly longing to experience it.

**10. You begin to feel the energy pulling you up into it, and your entire path becomes letting go of yourself in order to merge.** Will is no longer needed. Now your path is strictly about releasing yourself into the pull of the higher energy. You must surrender deeply enough to be able to overcome the fear of losing your connection to the personal self. You must to be willing to die to be reborn.

**11. Once you get far enough back into the energy, you realize that your personal life can go on without you, leaving you free to become immersed in Spirit.** This is the greatest miracle: You've surrendered and your entire life is about Spirit, yet people, places and things continue to interact with you. The difference is that these interactions require none of your energy. They happen naturally, by themselves, leaving you at peace and absorbed in Spirit.

**12. Now you are truly okay, and nothing inside or outside of you can cause disturbance—you have come to peace with it all.** Because you are now completely okay, you don't need anything. Things just are what they are. At this point, you know yourself as Self. The world, mind and heart cannot disturb you. You've transcended them all. What is more, instead of feeling drawn into Spirit, you now actually experience yourself as Spirit. You have no boundaries in time or space. You have always existed, and you will always exist. You have no form, shape, gender or body. You simply are, have always been and will always be—Infinite Spirit..


mithai4all
Your Shop Away From Home
Celebrate Diwali with Mithai4all
Send mithai gifts to your
parents, friends & relatives in India.
Order mithai online & get it home delivered
We also deliver to US, UK, Canada,
Singapore, Australia and 10+ countries

## MMSAC Calendar of Events 2016-17

| | |
|---|---|
| Apr 2 | Rangapanchami |
| May 14 | Gudhi Padwa & Maharashtra Din |
| Jun 11 | Picnic |
| Aug 5-7 | Camping |
| Sep 11 | Ganapati |
| Oct 15 | Kojagiri |
| Nov 12 | Diwali |
| Jan 14 | Sankrant & AGM |

**Except for first two events, the other dates are tentative**

# जगन्मित्र पद्माकर शेंडे

(त्यांचे परममित्र कुमार कुलकर्णी लिखित)

श्री. पद्माकर विषयी बोलायचे झाल्यास बरेच काही सांगावे लागेल. त्याच्याबद्दल विचार करताच मला महाराजांचा अभंग आठवला,

*दीपा पाठी पोटी, नाही अंधकार*
*सर्वांगे साकर, अवघी गोड*
*तुका म्हणे तैसा, सज्जनापासोन*
*पाहता अवगुण, मिळेचिना*

आम्ही त्याचे सारे मित्र त्याच्याशी ओळख झाली म्हणून स्वत:ला भाग्यवान समजत आलो आहोत. कधीही, कुठेही गप्पा मारतांना एखादी गोष्ट आम्हांला माहित नाही असे झाले की आम्ही एकसुरांत म्हणत असू की, पद्माकरला विचारु या. त्याचे कारण तो स्वत:च एक एनसायक्लोपिडिया होता. त्याच्याइतका अमेरिका आणि जगभर डोळसपणे फ़िरलेला दुसरा कुणी आमच्या पहाण्यात नाही. अत्यंत बुद्धीमान, हुषार, सकारात्मक प्रवृत्ति आणि जगन्मित्र असे त्याचे व्यक्तिमत्व! पानाफ़ुलांपासुन ते प्रसिद्ध, अप्रसिद्ध व्यक्ति विषयी ह्याच्याकडे सगळी माहिती तय्यार. गेली २०-२५ वर्षे, तसेच सौ. अनिता गेल्यापासून आणखीनच जवळ आलेला पद्माकर हा आम्हां मित्रांचा एक कुटुंबीयच होय. असं म्हणतात की, पुरुषाचे प्रेम मिळवायचा मार्ग हा त्याच्या पोटातून जातो म्हणजे त्याला भरपुर, चांगलं चुंगलं खायला घातले की झाले. पण सगळ्या जगाचे प्रेम मिळवायचे झाले तर तो मार्ग शब्दातून जातो म्हणजे नेहमी अशा शब्दांचा वापर झाला पाहिजे की जेणेकरुन समोरील व्यक्ति कधीही दुखावली जाणार नाही. पद्माकर अगदी तस्साच. त्याने कधीही, कुणाच्या बाबतीत उलटे सुलटे शब्द समोर वा मागे उच्चारलेले आम्हां कुणाच्याही ऐकिवात नाही. अत्यंत तल्लख बुद्धी, वैशिष्ठयपूर्ण स्मृती, मराठी इंग्रजी शब्द योग्य जागी वापरण्याचे कसब हे त्याचे गुण सगळ्यांना जाणवत असतील. १०-२० वर्षांनी भेटत असलेल्या कुटुंबाची नावे त्यांच्या मुलाबाळांच्या नावांसकट लक्षांत ठेवणे ही काही सामान्य गोष्ट नव्हे. त्याच्या या अशा बोलण्याने समोरचा माणूस त्याच्या एकदम प्रेमांत पडत असे. श्री ज्ञानेश्वर माउली म्हणते तसे,

*सुर्ये अधिष्ठीली प्राची, जगा जाणीव दे प्रकाशाची*
*तैशी वाचा श्रोतयां ज्ञानाची, दिवाळी करी*



चि. सौ स्वाती, चि. श्री. समीर आणि चि. स्मिता ही त्यांची मुले अतिशय गुणी आहेत. आई वडिलांच्या सेवेत त्यांनी तसूभरसुद्धा कमी केले नाही. मुलांचा असा उल्लेख तो माझ्याजवळ वारंवार करीत असे. तसाच तो आपल्या आत्या आणि आतोबांचा अत्यंत कृतज्ञतापूर्वक उल्लेख करत असे. आई वडिलांच्या मागे माझे सगळे लाड त्यांनी केले. पद्माकरने कधी कुणाविषयी असुया, राग वा चिडचिड किंवा परमेश्वराबद्दल कडवटपणा दाखवला नाही. गेल्या बुधवारी ३ तारखेला जेंव्हा त्याची माझी भेट झाली तेंव्हा तो म्हणाला की, "खाली एस्केटान मध्ये भोजनगृहात जी व्यवस्थापक आहे तिचे नाव "अनिता" आहे, तसेच काल मी आणि समीर व्हिलचेअर आणायला ज्या दुकानात गेलो होतो तिथल्या सेल्सलेडिचे नाव पण"अनिता - आहे की नाही गंमत!"

शनिवारी दुपारी जाण्यापूर्वी दोन क्षण तो चेहराभरुन हसला. काय माहीत, कदाचित त्याची "अनिता"च त्याला बोट धरुन न्यायला आली असेल. माझा असा समज आहे की जसे तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे,

*शेवट तो भला, माझा बहु गोड झाला,*
*आलो निजांच्या माहेरा, अवघा परिहार झाला.*

असे पद्माकरला वाटले असेल.

गेली ९-१० वर्षे आम्ही न चुकता दोघेहि फोनवर दररोज (शनिवार रविवार सोडुन) २५-३० मिनिटे बोलत असू. आठवड्यांतून कमीत कमी दोनदां प्रत्यक्ष्य दोन - दोन, तीन - तीन तास भेटत असू. पद्माकर मित्र म्हणून जसा मला भावला तसा तो सगळ्यांना जाणवेल असे मी कसे म्हणू! काहीजण म्हणतात पद्माकर भगवद्गीता खरे जगले, आपण नुसतेच गीता वाचणारे. माझे काही मित्र पद्माकरला "गुरु" म्हणतात, म्हणजे माउली म्हणते तसे त्यांच्या मनांत असेल,

*"मज हृदयी सदगुरु, तेणे तारिला हा संसारपुरु"*

आतां श्री पद्माकर आपल्यांत नाही हा विचार मनाला पटत नाही, पद्माकरची उणीव आपल्यासारख्यांना सतत जाणवेल.

**........कुमार कुलकर्णी**

Written by - Sudheer Karnik
(Padmakar's close friend from Sacramento days)

फिनिक्स, ॲरीझोना
१२ मार्च २०१६

# "गुरु"

पद्माकर शेंडे ---- उर्फ "पॅडी" शेंडे, माझा प्रिय आणि जिवलग मित्र, ६ फेब्रुवारीला दुपारी एकच्या सुमारास आपल्या सर्वांपासून खूप दूर निघून गेला. पुन्हा परत न येण्यासाठी! कायमचा अनंतात विलीन झाला.

पद्माकर आणि त्याच्या कुटुंबाशी आमची प्रथम ओळख तुषार आणि वंदना दळवी यांच्या घरी सॅक्रॅमेंटोत झाली. आमच्या मुलांचीही एकमेकांशी गट्टी जमली. हळूहळू ओळखीचे रूपांतर गाढ मैत्रीत झाले आणि पहाता-पहाता आमच्या तीन कुटुंबाचा सॅक्रॅमेंटोतील "ORIGINAL TRIO" म्हणून उल्लेख सुरु झाला. अनेक कार्यक्रमात आम्ही तिघे परिचीत व्हायला लागलो ते याच उल्लेखाने!

प्रकृतीच्या कारणाने तुषार आणि वंदना दळवी सॅक्रॅमेंटो सोडून पुण्यास निघून गेले. TRIO मधील एक कमी झाला! पद्माकर आणि मी दर शनिवारी किंवा रविवारी चालण्याच्या निमित्ताने एकमेकांस भेटतच राहिलो. बोलण्याची आवड असल्यामुळे पद्माकर कायम बोलतच असायचा. अनंत विषयांवर तो न थकता बोलायचा. त्याच्या बोलण्यात आणि गोष्टी सांगण्यात निर्भिडपणा आणि आत्मविश्वास असायचा. दांभिकपणा किंवा खोटेपणा नसायचा.

चालण्याच्या आवडीमुळे लवकरच आम्ही एक "WALK GROUP" तयार केला. रमेश आणि अरुणा कोतवाल, कुमार आणि शीलाताई कुलकर्णी, यशवंत आणि मुक्ता कुलकर्णी, पद्माकर आणि अनिता शेंडे आणि आम्ही दोघे, असे आम्ही दहा जण दर शनिवारी किंवा रविवारी चालण्याच्या निमित्ताने एकत्र भेटत राहिलो. आमच्या वाटाड्या आणि माहितगार अर्थातच पद्माकर असायचा. तब्बल सहा वर्षे आम्ही संघटीतपणे

आणि न थकता चालतो. हळूहळू या चालण्याला मर्यादा यायला लागली. प्रकृतीच्या कारणाने एक-एक जोडपे माघार घेऊ लागले. उरले ते आम्ही दोघे... पद्माकर आणि मी! आम्ही दोघे खूप काळ चालण्याच्या निमित्ताने फिरत राहिलो. पद्माकरचा अभ्यास, अनुभव आणि ज्ञान एवढे प्रगल्भ होते की त्याच्या बोलण्यामुळे आणि स्पष्टीकरणामुळे मी फार चकित झालो. सर्व विषयांवर एवढे प्रभुत्व असलेला, साधा दिसणारा हा माणूस, माझा मित्र आहे यावर माझा विश्वास बसला नाही. अनेक प्रश्न मी त्याला विचारत असे. अनेक प्रकारे तो मार्गदर्शन करत असे. त्याच्या ह्या ज्ञानी वृत्तीमुळे मी त्यास "गुरु" म्हणायला लागलो. माझे WALK GROUP मधील मित्र सुध्दा त्याचा उल्लेख माझा गुरु म्हणून करू लागले.

एकदा तो मला म्हणाला की "सुधीर, तू मला गुरु म्हणतोस. पण खरं सांगतो, गुरु होणं फार सोप्पं आहे. आजकाल गुरु पावलोपावली पन्नास मिळतात पण योग्य शिष्य मिळत नाही. मी दचकलो. मला वाटले की मी त्याच्या दृष्टीने योग्य किंवा चांगला शिष्य नसावा. पुढे तो म्हणाला की गुरूने दिलेला मंत्र किंवा गुरूने दिलेली दिक्षा शिष्याने जर अमलात आणली नाही तर गुरूची विद्या आणि शिष्याची अक्कल दोन्ही फुकट गेली असं समज. असो, खळखळून हसून त्याने तो विषय तिथेच संपवला.

पुढे पुढे पद्माकरची प्रकृती ढासळत गेली. त्याचे फोन येणे कमी झाले. "मला तू भेटायला ये" अशा भाषा व्हायला लागल्या. आम्ही या विषयावर राहूलशी बोललो. राहूल पद्माकर काकाशी फोनवर बोलला. आणि ऑक्टोबर महिन्यात, त्याच्या वाढदिवसाच्या महिन्यात, त्याला भेटायला सॅक्रॅमेंटोला गेलो. ती आमची शेवटची भेट!!! अति उत्साहाने, कृष परीस्थितीत, त्याने एस्कर्टोन मधील त्याच्या मित्र-मैत्रीणींशी आमची ओळख करून दिली, त्याची रहाती जागा आम्हाला दाखवली आणि आमचा निरोप घेऊन पुन्हा परत

न घेण्यासाठी तो कायमचा निघून गेला.

पद्माकरचे अक्षर सुंदर होते. तो चांगली चित्रे काढायचा आणि जगातील सर्व प्राणिमात्रांवर भरपूर प्रेम करायचा. बोलण्याची आवड असल्यामुळे त्याचा मित्र परिवार मोठा होता आणि स्मरणशक्ति जबरदस्त होती. पुरवाटी वस्तू किंवा व्यक्ति त्याला आवडली नाही असं कधी झालं नाही. प्रत्येकात त्याला काही तरी चांगलं दिसत असे आणि तो तसे बोलून दाखवी. मदतीसाठी त्याचा हात नेहमी पुढे असे. असो, सारे संपून गेले आणि राहिल्या त्या आठवणी!

आमचा ORIGINAL TRIO असा संपुष्टात यायला लागला याचे दुःख नक्कीच होते. आधी तुषार गेला. पाठोपाठ माझा गुरुही निघून गेला. एकाकी पणाची जाणीव दुःखकारक असते हे कळूं लागले. जुन्या आठवणींची मनात गर्दी होऊ लागली. विचार करता करता इतका भारावून गेलो की त्याची जाणीव अचानकपणे पडणाऱ्या अश्रुने झाली.

पद्माकर, तू जिथे असशील तिथे आनंदात असशील ही माझी खात्री आहे. तो तुझा स्वभावच आहे. तुझ्या सहवासात घालवलेले दिवस नेहमीच लक्षात ठेवीन. तुला आमच्या सर्वांतर्फे पुन: एकदा प्रणाम करत आहे. गुरु, तू याचा स्वीकार कर ही सदिच्छा!

तुझा शिष्य,

सुधीर


KS KULKARNI LEGAL SERVICES
Estate Planning ■ Employment Law ■ HR Consulting
Eliminate Uncertainties
Estate plans assure that your wishes regarding health care, property distribution and final arrangements are honored, with:
• Wills and trusts
• Advance health care directives
• Durable power of attorney
• Guardianship for minors
Deepa A. Kulkarni, Attorney at Law
CA Bar License #287097
Davis
510 Fourth St.
www.kulkarnilegalservices.com
(530) 302-5602
Sacramento
555 University Ave., Suite 290


WISH MY TRIP
Get
Pack
Go..
For lower Air Fares on Int'l Air Tickets
Bhavin ( Bobby ) Shah
510 400 TRIP ( 8747 )
510 400 7784 ( Fax )
www.WishMyTrip.com
Reservations@WishMyTrip.com
www.facebook.com/WishMyTrip
Like
Accredited by
IATAN
CST # 2117495-40

# नटसम्राट नाटकावर आधारीत केलेला 'नटसम्राट' सिनेमा

तात्यासाहेब शिरवाडकरांच्या अजरामर नाटकावर एक मत मांडले जात असे की 'हे नाटक एका कोणत्याही घरातील म्हाताऱ्याचे असू शकेल'. हे मत खरे ठरविणारा सिनेमा श्री.महेष मांजरेकर यांनी चांगला बनविला आहे. तो करीत असताना त्यांनी 'नटसम्राट' नाटकावर आधारीत असे म्हणून स्वतःची पूर्ण सुटका करून घेतली आहे.

नाटकामध्ये म्हाताऱ्या नटाची शोकांतिका असली तरी नटाचे मोठेपण कोठेही हारवले नाही. उलट सिनेमात मात्र नटाच्या मोठेपणापेक्षा एक नट म्हणून आयुष्यभर काम केलेल्या एका म्हाताऱ्याची शोकांतिका लक्षात राहते. नटाचे मोठेपण कधीही जाणवत नाही. एका म्हाताऱ्याचा भणंगपणाच जास्त वेळेस नजरेला टोचतो. त्याचे दारू पिणे, शिव्यांच्या भाषेत सतत बोलणे, चहाच्या टपरीपर काम करणे, नातीला बैठकीतील मुजरा शिकविणे, मित्राबरोबर अर्वाच्य भाषेत सतत गप्पा मारणे हे त्याच्या बद्दल घृणा निर्माण करणारे वाटते. नाटकातील गणपतराव नातीबरोबर खेळताना लाडाच्या शिव्या देतो पण त्यात खालच्या थरावर गेल्याचे कधीच वाटत नाही. नाटकात जावयाच्या साहेबांशी बोलताना त्यांना चार शब्द सुनावतो पण साहेब सुध्दा मर्यादा सोडून बोलत नाहीत. शेक्सपियर बद्दलचा अडाणीपणा वर गणपतराव नाखूष होतात. सिनेमात साहेबांच्या मुलाने शेक्सपियरचा पार चोळामोळा करून टाकला आहे. नाटकात ही सगळी गणपतराव बेलवलकर नटसम्राटाची काळी बाजू पहात असताना त्याच्या बद्दल आदर यत्किंचतही कमी होत नाही. काळी बाजू दाखवित असताना नटाची सोनेरी फ्रेममधील प्रतिमा कधीच डागाळली गेलेली वाटत नाही.उलट पक्षी त्यांच्या अशा वागण्याचे आपल्याला वाईटच वाटते. या सिनेमातील भडकपणामुळे नाटकातील नटमंडळींचे आयुष्य कसे होते याचेच जास्त ठळक चित्रण झाल्यासारखे वाटते. गणपतराव बेलकरांच्या नटा पेक्षा त्यांच्यातील वाहवत जाणेच जास्त प्रकर्षाने दिसते व त्याच्याबद्दल राग येतो. कणव तर मुळीच येत नाही. असाच एका अतुलनीय गायक नटाचा सिनेमा 'बालगंधर्व' त्यांच्या वागण्याचे, उधळपट्टी चे आपल्या मनाला सलते पण म्हणून त्यांच्या आपल्या मनातील आदरयुक्त प्रतिमेला कधीच तडा जात नाही. असे होणे हे 'नटसम्राट' या सिनेमात अपेक्षित होते ते तसे झाले नाही.

कै. शिरवाडकर यांचे नाटक बाजूला ठेऊन एक सिनेमा म्हणून पाहिला तर नानाने अतिशय सुंदर अभिनयाने व ताकदीने 'नटसम्राट' उभा केला आहे. पण तरीही सिनेमात जेव्हा नाना शिरवाडक यांचे शब्द किंवा स्वगते बोलतो तेव्हा नाना फार अप्रतिम बोलला आहे. पण ज्यावेळी तो सिनेमा मधील शब्द बोलतो तेव्हा नानाच्या नेहमीच्या लकबीनेच तो बोलतो. त्यात शिरवाडकरीण शब्दाचे वजन हारवून जाते. त्याचे बोलणे फार कॅज्यअल वाटते.नानाच्या संवाद बोलण्याची एक लय आहे ती यातही दिसून येते. नाटकात थैली मिळताना सुध्दा एक प्रकारचा लोकांच्या मनात असलेला आदर नुसत्या शब्दातून आपल्याला पोहोचतो. सिनेमात मात्र नटसम्राटाच्या सत्काराचा समारंभ व त्यानंतर घरात त्याने केलेल्या दानपत्राचा प्रसंग फारसा परिणामकारक वाटत नाही. नाटकात मात्र सुरवातीलाच येणारा तो प्रसंग हा संपूर्ण नाटकाचा मूळ पायाभूत असून तो खूप परिणाम साधून जातो. प्रसंगाबरोबर झालेल्या मानसिक आघाताने खचलेला गणपतराव नानाने छान उभा केला आहे तरी निवृत्तीनंतरचा गणपतराव दाखविताना नाना शारिरिक वय दाखविण्यात थोडा कमी पडला आहे असे वाटते.

नाटकात कावेरी ही अत्त्यंत मवाळ, प्रेमळ, समजुतदार व सतत नवऱ्याच्या स्वभावाला दबलेली पण त्याला सतत सोबत व साथ देणारी वाटते. सिनेमात ती तितकीशी प्रभावीपणे चित्रित झालेली वाटत नाही. विशेषतः चोरीचा आळ येण्यापूर्वी नाटकातील एक प्रसंगात त्या दोघांच्या नात्याचे जे दर्शन घडते ते सिनेमात कधीच जाणवत नाही. गलबताने अखेर पोहोचणाऱ्या बंदरासारखी कावेरी वाटत नाही. काही वेळा तर कावेरी जरा जास्तच अधिकाराने बोलल्याप्रमाणे वाटते. हा मवाळपणा बोलणे व दिसण्यापेक्षा शारिरीक अभिनयातूनही जास्त येणे आवश्यक होते असे वाटले.

मुलगा, सून, मुलगी व जावई हे मात्र अगदी योग्य वाटले. मुलगी झालेल्या मृण्मयीने तर फार छान काम केले आहे. नाटकातील मैत्री ही अत्त्यंत घट्ट असते आणि ती मैत्री फार चांगली सिनेमात दिसते. एकूण मित्राचा नटसम्राटाच्या आयुष्यातील सहभाग मन हेलावून सोडणारा आहे. विक्रम गोखले हा अत्त्यंत ताकदीचा नट. त्याने अतिशय सुंदर राम चितारला आहे. सर्वात मरणावस्थेत असताना त्याने दिलेला कौतेयचा संवाद तर दाद देण्याचा झाला आहे. गणपतराव बेलवलकर पेक्षा तो जास्त उत्तम नट होता हे नुसते संवादातूनच नव्हे तर प्रत्यक्ष पदद्यावर सुध्दा आपल्याल पटते. नाटकापेक्षा ‘राजा’ हे पात्र सिनेमात जास्त महत्व घेऊन जाते व ते पडद्यावर दाखविता येणाऱ्या बारकाव्यामुळे.

सिनेमात चित्रस्थळ म्हणजे लोकेशन खूप छान दाखविली गेली आहेत. फुटपाथवर रहात असलेली वस्ती, बंधाऱ्यावर असलेला जावयाचा बंगला, आडवळणाला असलेले देऊळ, पडक्या अवस्थेत असलेले थिएटर हे सगळे सिनेमाची उंची व खोली वाढविण्यास मदत करते.

अमेरिकेत असूनही ताजा असतानाच हा व कटयार काळजात घुसली हे दोनही सिनेमा पहायला मिळाले याचा फार आनंद झाला. दोन सिनेमांची तुलना म्हणून नव्हे तर कटयार हा मूळातील नाटकाच्या गाभ्याला जास्त न्याय देणारा चित्रपट वाटला. नटसम्राट हा स्वतंत्र चित्रपट म्हणून पाहिला तर तो चांगलाच वाटतो पण मनात इतकी वर्षे जतन करून ठेवलेला मूळ ‘नटसम्राट’ नाटकाचा पगडा जात नाही त्यामुळे सिनेमा हा वेगळाच वाटतो. नाटकाच्या मनःपटलावरील त्याच्या आलेखाला सिनेमा पर्याय होऊ शकत नाही. सिनेमा थिएटरमधून बाहेर पडताना एकच विचार मनात येतो अरे आपण प्रेम करत असलेले ‘नटसम्राट’ नाटक असे नव्हते. तरीही सिनेमा मनातून पुसल जात नाही हे खरे.

अरविंद साने,
१८४४, ॲपलक्रॉस कोर्ट,
फोलसम, कॅलीफोर्निया, युएस्ए, ९५६३०
फोनः ९१६ ३५८ ६३६६
ईमेलः bhausane@yahoo.com

# कविता - अजित नातू



## Obsolete Thee Loyalty!

==================

**Just remove word "Loyalty" from the dictionary**
**It was royal n is meaningful only in memory**

### In memory

Loyalty was a must and was customary
Loyalty was best quality of a personality

Wars were fought just on loyalty
Relations broken n build in reality

Spouse stuck with muddy marriages
Workers sustained hardship for ages

Generations were faithful to inheritance
Nations valued it as bestowed remittance

Even a chess pawn was protected by mighty all
Even home helper was treated as a family by all

### And now

I am afraid our generation caught in middle
We believe in it but returns are all muddle

Becoming like the lonely fiddler on the roof
Unnoticed, discarded, considered as a goof

Companies do not value us anymore
Employees laugh at it n do not care

Marriages change partners just on Pittance
Children distance parents just in an instance

Yes there is loyalty but it is just to only self
It's called personal growth, focus on myself

Pawn of a chess game now sacrificed for nothing
Loyal person gets laughed at as if his wrong doing

**Oh Beloved Loyalty!**

**Only I will cry for you, sorry you are becoming obsolete**
**With same token, what am I doing here, for both, it is so late**

## सॅक्रामेंटो मराठी शाळा : दुसरे वार्षिक संमेलन

*पल्लवी सावंत आणि अमिता खरे (शाळा समन्वयक)*

मराठी मंडळ सॅक्रामेंटो शाळेचे दुसरे वार्षिक संमेलन गेल्या महिन्यात आयोजित केले होते. ह्या वर्षीदेखील मुलांनी गाणी व छोटी नाटके सादर करून आपल्या विविध कलागुणांचे प्रदर्शन करून कार्यक्रम रंगवून टाकला. शिक्षकांनी आणि पालकांनी मुलांची तयारी करून घेतली होतीच पण त्याशिवाय मुलांनी आपापल्या कार्यक्रमांसाठी स्वतः काही कल्पना सुचवल्या. शाळेच्या कमिटीने हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला. ह्या कार्यक्रमातील काही क्षणचित्रे.










( http://shala.mmsac.org/ वेबसाईटवर वार्षिक दिनाची क्षणचित्रे अपलोड केली जातील )

## अमेय धुमाळची चित्रकला

Name: Ameya Dhumal
Age: 11 years
Medium: Mixed Media (color pencil, soft pastel and oil pastel)
Description: The majestic Peacock, India's National bird is a symbol of joy, beauty and grace.
Competition Details: This was Ameya's entry for BMM Shala Digital calendar project. The scope of the initiative was to design a 2016 calendar using pictures drawn by BMM Marathi Shala Students based on specific themes. Copies of the calendar were made available for purchase and free for all participants. Ameya was proud to represent Marathi Shala Sacramento for this initiative.

## शाब्बास अमेय



## हे करून बघा:

- चमचाभर शुद्ध मधात चिमुटभर पांढरी मिरी पावडर टाकुन दिवसातुन ३ वेळा असे ४दिवस ५- घेतल्यासही खोकला कमी होतो.

## हे माहित आहे?

- मुलानो, लोकमान्य टिळकांना जेंव्हा छोटे होते त्यावेळी त्यांचे शालेय शिक्षक काय म्हणायचे माहित आहे? "सूर्याचे पिल्लू" असे संबोधायचे. कारण अर्थातच, छोटा बाळ (टिळक) सूर्यासारखा तेजस्वी, मानी, नियमित, सगळ्यांमध्ये तळपणारा होता. लहानपणापासून तुम्हीसुद्धा असेच स्वाभिमानी, तेजोमय बनण्याचा प्रयत्न करा.
- मुलानो, १९४७ मध्ये जेंव्हा भारत स्वतंत्र झाला तेंव्हा मुंबई हि State of Bombay ह्या राज्याची राजधानी होती. ह्यात मुंबई व गुजरातचे प्रांत सहभागी होते. पुढे १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र राज्य स्थापन झाले व मुंबई त्या राज्याची राजधानी बनली. मुंबई संदर्भात महत्वाची सनावळी खाली दिली आहे:
    - 1534 - Bombay islands were captured by the Portuguese.
    - 1661 - The islands were gifted in the dowry to Charles II of England.
    - 1668 - Charles II gave the islands to the East Indian Company on lease.
    - 1708 - Bombay became the H.Q. of the East India Company.
    - 1862 - The islands were merged to shape one stretch.
    - 1869 - Suez Canal was opened and Bombay developed as an international port.
    - 1947 - Bombay was declared the capital of Bombay state.
    - 1960 - Bombay was made the capital of Maharashtra.
    - 1995 - The name was changed to Mumbai

# गम्मत

- मराठी डोके चालवा कि:

  जपान मध्ये एका नामांकीत साबण कंपनीच्या कव्हर मध्ये साबण न टाकताच तसेच रिकामे कव्हर पाठवून दिले.  असा प्रकार पुन्हा होऊ नये म्हणून तिथल्या इंजिनियर्सने ६० हजार डॉलर चे एक्स-रे मशीन विकत घेतले आणि प्रत्येक साबणाचे कव्हर चेक करून पुढे पाठवू लागले.

  असाच प्रकार एकदा आपल्या महाराष्ट्रात झाला, आपल्या मराठी इंजिनियर्स ने काय केले असेल!!!!

  विचार करा........... तर

  ६०० रूपायचा टेबल फॅन आणला आणि साबणाचे कव्हर त्यासमोरून पाठवले,रिकामे कव्हर आपोआप उडून गेले.

  आहे कि नाही मराठी डोके!

- मराठी चुटका :
  - शिक्षक सांगा पाहू :,  विद्यार्थी आणि डॉक्टर यांच्यामध्ये काय साम्यआहे?

  बंड्या: (हात वर करून सांगतो) : 'सर,  ओपेरशन झाल्यावर डॉक्टर आणि परिक्षा पेपर झाल्यावर विद्यार्थी... एकच same गोष्ट सांगतात.'

  शिक्षक: (चकित होऊन) काय ति गोष्ट?

  बंड्या: " आम्ही आमच्या परीने चांगले प्रयत्न केले, पण पुढच काही सांगू शकत नाही.... देवावर भरोसा ठेवा"





**मंडळाची रंगपंचमी - २ एप्रिल (आणखी फोटो पुढील अंकात)**



# पाककृती

## ब्रेडची भजी

**साहित्य -:**

एक मध्यम स्लाइस ब्रेड, दोन वाट्या बेसन पीठ ,दोन टेस्पून तांदळाचे पीठ.,दीडवाटी झणझणीत तिखट अशी बटाट्याची स्मॅश केलेली भाजी (भाजी तळल्यावर तिखटपणा कमीहोतो), चवीनुसार मीठ,मीठ, हिंग,हळद,जिरे पूड व बारीक चिरलेली कोथिंबीर ,तळणीसाठी कढई व तेल.

**कृती -:**

प्रथम एका बाउलमध्ये बेसन व तांदळाचे पीठ घेऊन त्यामध्ये चवीपुरते मीठ, हळद, हिंग ,जिरे पूड व बारीक चिरलेली कोथिंबीर घालावीमात्र भज्यासाठी .त्यात जरुरीप्रमाणे थोडेथोडे पाणी घालावे . असावे तसे पीठ जाडसर राहील, याची काळजी घ्यावीगॅसवर एका कढईत तेल तापत ठेवावे व . तेल चांगलेकडकडीत तापल्यावरच त्यात ब्रेडच्या कडाकाढून टाकून त्रिकोणी अगर चौकोनीतुकडे कापून घेऊन एका तुकड्यावर स्मॅश केलेलीबटाट्याची भाजी लावावी व त्याचेवर दूसरा तुकडा ठेऊन भिजवलेल्या पिठामध्ये बुडवून घेऊन भज्यासारखे तळूनघ्यावेही पावाची भजी हिरव्या . .चटणी बरोबर किंवा टोमॅटो सॉस सोबत खाण्यास द्यावी

चला मग ब्रेडची भजी बनवायला घ्या व कुटुंबाबरोबर आनंदाने मिटक्या मारत खा.

# शब्दकोडे



आडवे शब्द - (१) लहानसहान बाबीतदेखील नको इतकी काटकसर करणे (शेक्रि) (७) चोप, ताडन (८) जलद, मेघ (९) एका खेळात भीडूला उठविण्यासाठी योजावयाचा शब्द (१०) निंदानालस्ती; काढलेल्या द्रवाच्या अंगचा सत्त्वांश (१३) तंट्यात समेट घडविण्यासाठी उभय पक्षांनी मान्य केलेले मध्यस्थ (१५) कोथिंबिरीची बी (१६) छाती, वक्ष (१७) चीजेतील अक्षरे म्हणत म्हणत केलेला रागविस्तार (२०) अटीची भाषा (२१) शेतकरी लोक (२३) सरकी काढलेला कापूस (२४) छापील अक्षरासारखे अक्षर (२५) एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर वळण्याची क्रिया (२७) उकळी; उमाळा (२९) पत्नी, भार्या (३०) गणपतीला रुचणारा पदार्थ (३१) वेतन, पगार (३२) आटा मळताना त्यात घालावयाचे तेल, तूप आदी (३३) क्रीडा; नाटकाचा प्रयोग

उभे शब्द - (१) पंधराव्या शतकात होऊन गेलेला एक सत्शील इसम (२) होडी; जरचा स्पर्धक शब्द (३) प्रचलित असलेले, अमलात आलेले (४) शहर, पूर (५) अकस्मात हजर होणे (क्रिया) (६) विष्णू पत्नी (९) एका खेळाचे अर्धे नाव (११) धनदांडगा, लक्षाधिपती (१२) घेतलेले परत करण्याचा व्यवहार (१४) बऱ्या-वाईट स्थितीचा निदर्शक शब्द (१७) परि जयांच्या दहनभूमीवर नाही चिरा नाही पणती, अशी खंत त्यागी पुरुषांच्या दुर्दशेबद्दल व्यक्त करणाऱ्या कवींचे आडनाव (१८) गलबताने आणलेला माल (१९) शिस्तीने वागण्याचे नियम (२१) समरभूमीवरील रक्तपात (२२) अडचणीतून बाहेर काढणारा (२३) अक्कलशून्य (२५) अर्धवर्तुळाकार (२६) जिन्नस (२८) ढगांनी आक्रमिलेले आकाश (२९) वारा (३०) भुरळ, हवे वाटणे


Marathi Mandal Sacramento
Cordially invites you to
महाराष्ट्र दिन
गुढी पाडवा
Date & Time
Saturday, May 14th 2016, 1:30 PM.
Venue
Rosemont High School Auditorium
9594 Kiefer Blvd, Sacramento, CA 95827
श्रीधर फडके ह्यांच्या सांगीतिक कारकिर्दीला ४० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त त्यांचा सत्कार
आणि
स्व. बाबूजी व श्रीधरजी ह्यांच्या सुमधुर भावगीत, भक्तीगीत आणि चित्रपट गीतांचा नजराणा
“फिटे अंधाराचे जाळे”
सह-कलाकार:
मधुवंती भिडे (गायन)
अमोल चिपळूणकर (सिंथेसायझर)
सुदर्शन सिद्धये (तबला)
सतीश गदगकर (व्हायोलीन)
अभिजित जेरे (तालवाद्य)
डॉ. प्रवीण गौड (मेंडोलीन) आणि स्थानिक कलाकार
Visit http://mmsac.org for tickets (price includes tea, snacks and dinner) and more information or email committee@mmsac.org
Member Adult: $15(General Seating),$20(Premium Seating) Non-member Adult: $20(General Seating) Student: $10 Kids(5-12): $10



/namarathi
Online booking will open soon..
Cinema Bay Area
NJE
PHUNTROO
फुंतरू
SACRAMENTO
WRITTEN & DIRECTED BY SUJAY S. DAHAKE
April 9th • Century Roseville 14
An Eros International Worldwide Release


Wishing all Customers a
Happy Gudipadwa
&
Ugadi
Get the special and unbeatable price on gold jewelry,
40% off on diamond jewelry
get a free gift with every purchase above $1000.
Just for two days on April 8th and April 9th
PNG
PNG JEWELERS INC
820E El Camino Real, Sunnyvale, CA 94087. Ph.: (408) 245-6764
3760 Mowry Ave., Fremont, CA 94538. Ph.: (510) 791-3357
www.pngjewelers.com | PNGJewelersUSA